


# हस्तलिखित गीत संग्रह

## संग्रह व सुलेखन - अमित भोरकडे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोड्डी
ता. मंगळवेढा,जि. सोलापूर
मो.7588504852

# सुबह सवेरे लेकर तेरा

स्वर काली- १

सुबह सवेरे लेकर तेरा नाम प्रभू
करते है हम शुरु, आज का काम प्रभू .... ॥धृ॥ } २वेळा

मिलकर इस धरती को, चमन बनाएँ हम
गांधी गौतम राम कृष्णा बन जाए हम } २ वेळा
यही हमारा हो हरदम पैगाम प्रभू
करते है हम शुरु, आज का काम प्रभू ....॥१॥

मात-पिता की सेवा और सम्मान करे
उनकी खुशियों पर सब कुछ कुर्बान करे } २ वेळा
अच्छे कर्मो का अच्छा परिणाम प्रभू
करते है हम शुरु, आज का काम प्रभू ....॥२॥

शुद्ध भाव से तेरा ध्यान लगाये हम
विद्या का वरदान तुम्ही से पाये हम } २ वेळा
तुम्ही से है आगाज तुम्ही अंजाम प्रभू
करते है हम शुरु, आज का काम प्रभू ....॥३॥

गुरुओं का सत्कार कभी ना भूले हम
इतना बने महान गगन को छू ले हम } २ वेळा
तुम्ही से हर सुबह तुम्ही से शाम प्रभू
करते है हम शुरु आज का काम प्रभू ....॥४॥

सुबह सवेरे लेकर तेरा नाम प्रभू
करते है हम शुरु, आज का काम प्रभू ....

"अमित भोरकडे"

# ॥ हीच आमुची प्रार्थना ॥

हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी माणसासम वागणे

धर्म, जाती, प्रांत, भाषा, द्वेष सारे संपू दे
एक निष्ठा, एक आशा, एक रंगी रंगू दे
अन पुन्हा पसरो मनावर शुद्धतेचे चांदणे
माणसाने माणसाशी ....

भोवताली दाटला अंधार दुःखाचा जरी
सूर्य सत्याचा उद्या उगवेल आहे खात्री
तोवरी देई आम्हाला काजव्यांचे जागणे
माणसाने माणसाशी....

लाभले आयुष्य जितके ते जगावे चांगले
पाउले चालो पुढे जे थांबले ते संपले
घेतला जो श्वास आता तो पुन्हा ना लाभणे
माणसाने माणसाशी.....

- गीतकार- समिर सावंत
- चित्रपट- उंबटू (२०१७)

"अमित भोरखडे"

# प्रार्थना

|| प्रारंभी विनंती करू गणपती
विद्या- दयासागरा
अज्ञानत्व हरोनि बुद्धि मति दे
आराध्य मोरेश्वरा
चिंता, क्लेश, दरिद्र, दुःख अवघे
देशांतरा पाठवी
हेरंबा, गणनायका, गजमुखा
भक्ता बहू तोषवी ||

ॐॐ शुभं करोति कल्याणम्
आरोग्यम् धनसंपदा:
शत्रुबुद्धि - विनाशाय
दीपज्योति नमोऽस्तुते ।।
दिव्या दिव्या दीपत्कार
कानी कुंडले मोतीहार
दिव्याला पाहून नमस्कार ।। ॐॐ

"अमित भोरकडे"

# केशवा माधवा...

केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा ॥ धृ॥

तुझ्यासारखा तुच देवा,
तुला कुणाचा नाही हेवा,
वेळोवेळी संकटातूनी, तारिशी मानवा... ॥१॥

वेडा होऊनी भक्तीसाठी,
गोपगड्यांसह यमुना काठी,
नंदा घरच्या गाई राखशी, गोकुळी यादवा ॥२॥

वीर धनुर्धर पार्थासाठी,
चक्रसुदर्शन घेऊन हाती,
रथ हाकुनिया पांडवांचा, पळविशी कौरवा ॥३॥

"अमित भोरकडे"

# इतनी शक्ती...

इतनी शक्ती हमें देना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना
हम चले नेक रस्ते पे हमसे, भूलकर भी कोई भूल होना ॥ ध्रु॥

दूर अज्ञान के हो अंधेरे,
तू हमें ज्ञानकी रोशनी दे,
हर बुराई से बचते रहे हम,
जितनी भी दे भली जिंदगी दे
बैर हो ना किसी का किसीसे, भावना मनमें बदलेकी होना॥१

हम ना सोचे हमे क्या मिला है,
हम ये सोचे किया क्या है अर्पण,
फुल खुशीयों के बाँटे सभी को,
सबका जीवन भी बन जाए मधुबन
अपनी करुणा का जल तू बहाके, करे दे पावन हर एक मन का कोना॥२॥

"अमित भोरकडे"

# वसे तो देव

इकडे तिकडे शोधीसी कारे फिरशी वेड्यापरी
वसे तो देव तुझ्या अंतरी ।। धृ।।

सरिते काठी डोंगर माथी,
संतमुनीजन प्रभुगुण गाती,
या विश्वाचा जो निर्माता जागा असे श्रीहरी ।।१।।

मिळतो मानव जन्म एकदा,
ईश्वर एकच असे सर्वदा,
अज्ञानाचा सारुनी पडदा येई सन्मार्गावरी ।।२।।

असेल इच्छा जर मुक्तीची,
कास धरावी सद्भक्तीची,
वाट खरी ही आत्महिताची तूझीया धरतीवरी ।। ३।।

"अमित भोरकडे"

# तुम ही हो माता ...

तुम ही हो माता, पिता तुम ही हो ।
तुम ही हो बंधू, सखा तुम ही हो ॥ ध्रु॥

तुम ही हो साथी, तुम ही सहारे ।
कोई न अपना, सिवा तुम्हारे ।
तुम ही हो नैय्या तुम ही खिवैया ..... ॥१॥

जो खिल ना सके वो फुल हम है ।
तुम्हारे चरणोंकी धूल हम है ।
दया की दृष्टी सदा ही रखना ..... ॥२॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: । गुरुर्देवो महेश्वर: ।
गुरु:साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनम: ॥
उठा उठा हो सकळिक । वाचे स्मरावा गजमुख ।
ऋध्दि- सिध्दीच्या नायक । सुखदायक भक्तांसी ॥

"अमितभोरखडे"

# जय जय जय प्रथमेशा

जय जय जय प्रथमेशा गणेशा
मंगलमय कर सारे जीवन
शिव सुता तुज करितो वंदन
जय जय जय प्रथमेशा गणेशा ॥ धृ ॥

उरी निराशा खंत नसू दे
सदा हर्ष आनंद असू दे
पावनतेचा गंध वसू दे
रुजू दे.... फुलु दे ...
फुलू दे नव अभिलाषा ॥१॥

आकांक्षांना पंख फुटू दे
प्रतिभेचे नवरंग झरू दे
उल्हासाने जीवन भरू दे
बहर नवा दे या उन्मेशा ॥२॥

स्वप्नांना आकार मिळू दे
इच्छांना आधार मिळू दे
जगण्यातून ओंकार मिळू दे
गवस सुरातून तू अविनाशा ॥३॥

▸ आनंद कुलकर्णी.

"अमितभोरकडे"

# करितो प्रार्थना

काळी १.

करितो प्रार्थना, हे दाता तुज, मंगलता ही लाभो
ज्ञान कणांनी, वर्षुनी आम्हा (२ वेळा), विनम्रता ही लाभो ॥धृ॥

दे बुद्धी दे, दे शक्ती दे...
दे आशिष दे, तू सर्वांना
दे युक्ती दे, दे भक्ती दे...
घे चरणी घे तू सर्वांना
विनंती करितो, हे दाता तुज, कोमलता ही लाभो
ज्ञान कणांनी, वर्षुनी आम्हा (२ वेळा), विनम्रता ही लाभो ॥१॥

दे सद्बुद्धी, दे समृद्धी
ने प्रगतीस्तव, तू सर्वांना
विश्वबंधुता, विश्वएकता
दे ही भावना, तू सर्वांना
करितो कामना, हे दाता तुज, चंचलता ही लाभो
ज्ञान कणांनी, वर्षुनी आम्हा (२ वेळा), विनम्रता ही लाभो ॥२॥

करितो प्रार्थना, हे दाता तुज, मंगलता ही लाभो ....

"अमितभोरकडे"

# जय शारदे

स्वर काळी ५

जय शारदे, जय शारदे, जय शारदे, जय शारदे
हो प्रसन्न मज वरदान दे (२ वेळा)
जय शारदे, जय शारदे, जय शारदे, जय शारदे ॥धृ॥

सांऽ धऽ मऽ धऽ निऽ पऽ गऽ पऽ

जननी पिता गुरु बंधू ही
नाती अशी माझी तुझी
करुनी कृपा मज उद्धरी (२ वेळा)
मी शरण तुज वाग्देवते
जय शारदे, जय शारदे, जय शारदे, जय शारदे ॥१॥

करी ग्रंथ वीणा शोभते
देण्यास विद्या त्रिभुवनी
शिव सत्य सुंदर तत्व ते (२ वेळा)
मुर्तीत तुझीया नांदते
जय शारदे, जय शारदे, जय शारदे, जय शारदे ॥२॥

"अमित भोरकडे"

# देवा तू किती सुंदर

देवा तुझे किती, सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो ...॥धृ॥

सुंदर चांदण्या, चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे
पडे त्याचे ... ॥१॥

सुंदर ही झाडे, सुंदर पाखरे
किती गोड बरे, गाणे गाती
गाणी गाते ... ॥२॥

सुंदर वेलींची, सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा तुझी
देवा तुझी ... ॥३॥

इतुके सुंदर, जग तुझे जर
किती तू सुंदर असशील ... ॥४॥.

गीत: ग.ह.पाटील

सुलेखन- अमित भोरकडे

"अमित भोरकडे"

# मानवा इथे...

राग - यमन कल्याण

मानवा इथे, मी तुझे गीत गावे
असे गीत गावे ... तुझे हित व्हावे
मानवा इथे, मी तुझे गीत गावे .... ॥धृ॥

एकाने हसावे, लाखाने रडावे - २ वेळा
असे विश्व आता, इथे ना उरावे - २ वेळा
मानवा इथे, मी तुझे गीत गावे .... ॥१॥

तुझ्याच भूकेचे, कोडे उलगडावे २ वेळा
तुझे दुःख सारे, गळूनी पडावे २ वेळा
मानवा इथे, मी तुझे गीत गावे .... ॥२॥

असे तुझे माझे नाते जुळावे २ वेळा
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे २ वेळा
मानवा इथे, मी तुझे गीत गावे .... ॥३॥

इथे सारे सारे नवे पेरताना २ वेळा
वामनापरि मी तुझे हात व्हावे २ वेळा
मानवा इथे, मी तुझे गीत गावे .... ॥४॥

"अमित भोरकडे"

# सृष्टीवर अवघ्या एका

सृष्टीवर अवघ्या एका, प्रभूची पाखरं
वंदू सारे त्याला, जोडोनिया दोन्ही कर ॥धृ॥

प्रेम भावे पावन व्हावे, मनांचे गाभारे
अंश सर्व त्याचे आपण, एकरुप सारे
घेऊ त्याचे नाम मिळूनी, गाऊ निरंतर
वंदू सारे त्याला, जोडोनिया दोन्ही कर ॥१॥

नाम घोष त्याचा करुनी, भरु आसमंत
सुख-दुःख जाणी आपुला, सखा भगवंत
दीन दुःखितांचा दाता, रखुमादेवीवर
वंदू सारे त्याला, जोडोनिया दोन्ही कर ॥२॥

नावे वेगळाली तरी तो, देव एक आहे
सर्वभूती ठायी त्याचे, रुप मात्र पाहे
सेवाधर्मी राहे येशू, अल्लाह नि ईश्वर
वंदू सारे त्याला, जोडोनिया दोन्ही कर ॥३॥

(प्रत्येक ओळ २ वेळा म्हणणे)

अमित भोरकडे

# नमस्कार माझा...

नमस्कार माझा या ज्ञानमंदिरा,
सत्यम् शिवम् सुंदरा ॥ ध्रु ॥

शब्दरूप शक्ती दे,
भावरूप भक्ती दे,
प्रगतीचे पंख दे, चिमणपाखरा ॥ १॥

विद्याधन दे आम्हास,
एक छंद एक ध्यास,
नाव नेई पैलतीरी, दयासागरा ॥ २॥

होऊ आम्ही नितीवंत,
कला गुणी बुध्दीमंत,
किर्तीचा कळस जाई उंच अंबरा ॥ ३॥

"अमित भोरकडे"

# ॥ मनसा सततम् स्मरणीयम् ॥

मनसा सततम् स्मरणीयम्
वचसा सततम् वदनीयम्
लोकहितम् मम करणीयम् ... लोकहितम् .... ॥धृ॥

न भोग भवने रमणीयम्
न सुख शयने शयनीयम्
अहर्निशम् जागरणीयम् ..... लोकहितम् ... ॥१॥

दु:खसागरे तरणीयम्
कष्टपर्वते चरणीयम्
विपत्ती विपिने भ्रमणीयम् .... लोकहितम् .... ॥२॥

गहना अरण्ये घनांधकारे
बंधुजना हे स्थिता गह्वरे
तत्र मया संचरणीयम् ...
लोकहितम् मम करणीयम् .... ॥४॥

"अमित भोरखडे"

# खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे
जगी जे हीन अति पतित,
जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे ॥१॥

सदा जे आर्त अतिविकल,
जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे, जगाला प्रेम अर्पावे ॥२॥

कुणा ना व्यर्थ शिणवावे,
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधू मानावे, जगाला प्रेम अर्पावे ॥३॥

प्रभूची लेकरी सारे,
तयाला सर्व ही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे ॥४॥

असे हे सारे धर्माचे,
असे हे सारे सत्याचे
परार्थी प्राण ही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे ॥५॥

"अमित भोरकडे"

# 'देहाची तिजोरी'

देहाची तिजोरी, भक्तीचाच ठेवा
उघडदार देवा आता उघडदार देवा ॥ धृ ॥

पिते दुध डोळे मिटूनी जात मांजराची,
मनी चोरट्याच्या का रे भीती चांदण्याची,
सरावल्या हातानांही कंप का सुटावा ॥ १ ॥

उजेडात होते पुण्य अंधारात पाप,
ज्याच्या त्याच्या हाती आहे कर्तव्याचे माप,
दुष्टदुर्जनांची कैसी घडे लोकसेवा ॥ २ ॥

स्वार्थ जणू भिंतीवरचा, आरसा बिलोरी
आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी,
घडोघडी अपराधांचा तोल सावरावा ॥ ३ ॥

"अमित भोरकडे"

# जयतु शौर्यशालिनी

जयतु शौर्यशालिनी
जयतु पुण्यदायिनी
जयतु जयतु जयतु जगति
भरतभूमी मानिनी ... ॥धृ॥

स्यात गगन मंडळात नौबती निनादतात ,
समरसज्ज व्हा क्षणात दशदिशा बजावतात ।
जय स्वतंत्र लोकतंत्र, वीरमंत्र गात गात ,
लाख वादळा समान . उतरती दळे रणात ।
स्वाभिमान तळपुनी , सांगतात सांगिनी
जयतु जयतु जयतु .... ॥१॥

रक्त जोवरी नसात . प्राण तोवरी उरात
भावशक्ती मणसात , प्राणदेह पंजरात ।
मातृभूमी रक्षणार्थ झुंज धुंद संगरात
या अशा उफाळतात लाख उर्मी अंतरात ।
घुडकली पुरी बीनी भडकल्या कड्यावीनी
जयतु जयतु जयतु ... ॥२॥

अमित भोरकडे

# ये मत कहो खुदा से ....

ये मत खुदा से ... मेरी मुश्किले बडी है ।
ये मुश्किलों से कह दो ...
मेरा खुदा बडा है ।

आती है आंधीयाँ तो ... कर उनका खैर मकदम
तुफाँ सेहीतु लडने खुदा ने तुझे जडा है ।
ये मत खुदा से ... ॥

अग्नी में तपके सोना है और भी निखरता
दुर्गम को पार करके हिमालय कोई चढा है
लाएगी रंग मेहनत आखीर तुम्हारी एकदिन
होगा विशाल करवन वो बीज जो पडा है ।
ये मत खुदा से .... ॥

वो सर्व शक्तीयोंसे जब साथ है हमारे
हर काम उसके रहते हर गर्ज हुआ पडा है ...
कल भी हार ना ना हिंमत का कदम बढाओ
हजारों कदम बढाने वो सामने खडा है
ये मत खुदा से ... ॥

"अमितभोरखडे"

# वंदे मातरम्

राष्ट्र की जय चेतना का गान वंदे मातरम्
राष्ट्र भक्ती प्रेरणा का गान वंदे मातरम् ॥ध्रु॥
झल्लरी झनकार झनके नाद वंदे मातरम्,
शंख का संघोष चहुदिश व्याप्त वंदे मातरम्
राष्ट्र भक्ति प्रेरणा का .... ॥१॥
सृष्टी के बीज मंत्र का है, मर्म वंदे मातरम् ,
राम के वनवास का है साम्य वंदे मातरम् ,
दिव्य गीता ज्ञान का आधार वंदे मातरम्
राष्ट्र भक्ति प्रेरणा का .... ॥२॥
हल्दी घाटी के कणों में व्याप्त वंदे मातरम्,
दिव्य जोहर ज्वाला का है तेज वंदे मातरम् ,
विरों के बलिदान का आधार वंदे मातरम्
राष्ट्र भक्ति प्रेरणा का .... ॥३॥
पादाक्रांत करेगी धरती गर्जत वंदे मातरम् ,
हरीदल थरथर कापे सुनकर नाद वंदे मातरम् ,
विर पुत्रों की अमर ललकार वंदे मातरम् ,
राष्ट्र भक्ति प्रेरणा का गान वंदे मातरम् ॥४॥

•••

"अमित भोरकडे"

# मेरा मुल्क मेरा देश

मेरा मुल्क मेरा देश मेरा ये वतन
शान्ति का उन्नति का प्यार का चमन ॥धृ॥ २वेळा
इसके वास्ते निसार है
मेरा तन मेरा मन
ए वतन ए वतन ए वतन जानेमन जानेमन जानेमन २वे
मेरा मुल्क मेरा देश .....

इसकी मिट्टी से बने तेरे मेरे ये बदन
इसकी धरती तेरे मेरे वासते गगन
इसने ही सिखाया हमको जीने का चलन ....
जीने का चलन ...
इसके वासते निसार है ..... ॥१॥

अपने इस चमन को स्वर्ग हम बनायेंगे
कोना कोना अपने देश का सजायेंगे
जश्न होगा ज़िन्दगी का होंगे सब मगन
होंगे सब मगन
इसके वास्ते निसार है.... ॥२॥

"अमित भोरकडे"

# ऐ प्यारी भारत माँ

ऐ प्यारी भारत माँ, तेरे हम गीत गाते है २वेळा
गुणगुणाते है, खुशी से गीत गाते है ..... ॥धृ॥ २वेळा

स्वर लहरों का गुँजन माँ, झरझर झरते झरनों में
हँसी खुशी का नर्तन माँ, थिरक थिरक किया मोरोंने
स्वतंत्रता का विजयगान हम जोर से गाते है २वेळा
ऐ प्यारी भारत माँ, तेरे हम गीत गाते है... ॥१॥

जीना हमने सीखा माँ, छत्रपती शिवराजा से
मरना हमने सीखा माँ, शेर शंभूराजा से २वेळा
जीना मरना तेरे कारण (२वेळा) शपथ उठाते है, २वेळा
ऐ प्यारी भारत माँ, तेरे हम गीत गाते है... ॥२॥

"अमित भोरकडे"

# पून्हा नव्याने नव्या दिलाने

पून्हा नव्याने, नव्या दिलाने, गाणे गाऊया २वेळा
या भूमीचे, या आईचे, गाणे गाऊया ... ॥धृ॥ २वेळा
ला ला ला ला ऽऽ ..... ४ वेळा

आकाशीचे रंग उडाले, मावळले तारे (२वेळा)
फितूर आणिक होऊन गेले, सळसळते वारे
चला उठा रे बदलू सारे स्वतःस बदलू या २वेळा
पून्हा नव्याने नव्या दिलाने गाणे गाऊया ...॥१॥
ला ला ला ला ऽऽ .... ४ वेळा

सरळ बोलू या, सरळ वागू या, सरळ विचारांनी २वेळा
नवीन आशा नवीन भाषा हाती घेऊनी
नवे चित्र हे नव्या आकाशी आता काढू या २वेळा
पून्हा नव्याने नव्या दिलाने गाणे गाऊया ...॥२॥
ला ला ला ला ऽऽ .... ४ वेळा

फुलून येतील शेतमळे मग हिरव्या गाण्याने (३वेळा)
आईचे मग भरून येतील डोळे मायेने (२वेळा)
त्या मायेच्या चरणापाशी जन्मच वाहू या २वेळा
पून्हा नव्याने नव्या दिलाने गाणे गाऊया ...॥३॥
ला ला ला ला ऽऽ .... ४ वेळा

"अमित भोरकडे"

# देश सारा एकीच्या...

(स्वर काळी २)

देश सारा एकीच्या, शक्तीने भारुया
आपण सारे, वैर आपुले, एक दिलाने सारु या ॥धृ॥

कोणाला, कोणीही, साथ द्यावी चांगली
माणसातली माणूसकी ना, अजून येथे पांगली
हृदयांना, हृदयांनी प्राणपणाने तारु या...
आपण सारे, वैर आपुले, एक दिलाने सारु या ॥१॥

उंच नभाचे, गोड निळेपण, मनात बसवू आता
आनंदाचे, निर्मळ देणे, देऊ जाता जाता
देवदूत जणू, आम्ही येथे प्रेमाने अवतरु या...
आपण सारे, वैर आपुले, एक दिलाने सारु या ॥२॥

इतिहासाने, पूर्वज सारे, आजवरी जरी जपले
कसे विसरतो, आम्ही त्यांना, भान कुठे हरपले
निष्ठेची, श्रद्धेची, वृंदावने फुलारु या...
आपण सारे, वैर आपुले, एक दिलाने सारु या ॥३॥

"अमित भोरकडे"

# कभी किसी के कहने पर...

स्वर - काळी १

कभी किसी के कहने पर ना तोडेंगे हम
यह देश हमारा, जान से प्यारा, जोडेंगे हम
भारतीयम् ऽऽ भारतीयम् ऽऽ, हम है भारतीयम् ऽऽ भारतीयम्

ये संतो की भूमी पावन, स्वर्ग से महान है २ वेळा
ये शूरों की भारतमाता, प्राण से भी प्रिय है २ वेळा
बँटवारा जो करे देश का, उसको भी देखेंगे हम
यह देश हमारा, जान से प्यारा, जोडेंगे हम
भारतीयम् ऽऽ भारतीयम् ऽऽ, हम है भारतीयम् ऽऽ भारतीयम् ॥१॥

धर्म पंथ और भाषा जाति भिन्न भिन्न है २ वेळा
विभिन्नता में ऐक्य हमारा विश्वशांती वंद्य है २ वेळा
मानवता का धर्म हमारा जागने जिएंगे हम
यह देश हमारा जान से प्यारा जोडेंगे हम
भारतीयम् ऽऽ भारतीयम् ऽऽ हम है भारतीयम् ऽऽ भारतीयम् ॥२॥

"अमितभोरकडे"

# हमको मन की शक्ती देना

स्वर काली ५

हमको मन की शक्ती देना } २ वेळा
श्रद्धा-विश्वास की भक्ती देना
हे ईश्वर तुम, हमको अपने, शरण में सदा रखना ॥धृ॥
ल ल ला, ल ल ला, ल ल ला ला, ला (२वेळा)

सपने जगा दे, हमारे मन में } २वेळा
नयी रोशनी, दिखा दे जग में
आगे आगे बढ़ते जाएँगे हम हम हम
हमको मन की शक्ती देना ........ ॥१॥
ल ल ला, ल ल ला, ल ल ला ला, ला (२वेळा)

आँधियाँ घिर आये, तुफान भी आये } २वेळा
न घबराये, न कतराये
ऐसी शक्ती ताकद पायेंगे हम हम हम
हमको मन की शक्ती देना ........ ॥२॥
ल ल ला, ल ल ला, ल ल ला ला, ला (२वेळा)

शिक्षा का सागर, बहेगा जग में } २वेळा
अशिक्षा का अंधियारा, भागे तम में
ऐसा वरदान तो पायेंगे हम हम हम
हमको मन की शक्ती देना ....... ॥३॥ (२वेळा)

"अमित भोरकडे"

# हे शिवसुंदर समरशालिनी

हे शिवसुंदर समरशालिनी , महाराष्ट्र माऊली
युगायुगांची, जीवनगंगा , उदे तुझ्या पाऊली ... ॥धृ॥

मराठमोळी, जमीन काळी , सह्यगिरीचे कडे
सदाशिवाची, चरणचाल या तून एकदा घडे
पायखुणांवर स्मरणमंदिरे , इथे उभी राहिली
युगायुगांची, जीवनगंगा ........ ॥१॥

शिवहास्यासम, मुक्त वाहते, इकडे गोदावरी
ज्वारीसह समशेर पोसली, कृष्णा तीरावरी
विसावली वर्धेवर अवघ्या, दुतियेची सावली
युगायुगांची , जीवनगंगा ..... ॥२॥

भावभक्तीचे, पुन्हा पुन्हा तुज, अभिवादन भगवती
तुझ्या पदावर , नव्या युगाची , घडेल अमरावती
किरण क्रांतीचे , दिसतील देवी, तुझ्याच उदयांचली
युगायुगांची, जीवनगंगा ....... ॥३॥

"अमित भोरकडे"

# महाराष्ट्र गीत

हिमालयाशी सांगती नाते सह्यगिरीचे कडे
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय निनादती चौघडे ॥धृ॥

दगडांचा हा देश छाती दगडाची याची
अभंग आवेशाच्या मागे स्फूर्ती शिवबांची
राष्ट्रधर्म हा एकच तारा बुद्धी शक्तीच्या पुढे ॥१॥
जय महाराष्ट्र ....

गडागडांवर कड्याकड्यावर इतिहासाच्या खुणा
मनामनांवर मंत्र घालुनि देत नव्या प्रेरणा
मान रक्षिण्या इथे शिंपले रक्ताचे किती सडे ॥२॥
जय महाराष्ट्र .....

संतांचा हा देश सोयरा पिडित दुःखितांचा
वीरांचा हा देश आक्रमक रक्षक दिनांचा
तळपत राहिल सदैव जोवरी चंद्र सूर्य हे खडे ॥३॥
जय महाराष्ट्र .....

"अमित भोरखडे"

# रक्ताने लिहुनी गाथा

रक्ताने लिहुनी गाथा, प्राणांचे दिले बलिदान
त्या अमरवीरांचा देश, हा स्वतंत्र हिंदुस्तान
हा स्वतंत्र हिंदुस्तान .... ॥ धृ ॥

सारेग रेगप गपध पधसां... साधप धपग पगरे गरेसा
अलाप ----

जुलमास दिले आव्हान, स्वराज्य रोवोनी पाया
प्राणात असे तो प्राण झुंजले वीर शिवराया
बाजीने रोखली खींड, समरांगणी देवुनी प्राण
त्या अमर वीरांचा देश, हा स्वतंत्र हिंदुस्थान ... ॥१॥

पाठीशी बांधुनी बाळ, झुंजली झाशीची राणी
फेकुनी तटाहुन घोडा, शत्रूस पाजले पाणी
शौर्याचे निर्झर गाती, आजूनी गौरव गाण ....॥२॥

घालता गळ्यामध्ये फास, मातेचे भरले डोळे
हृदयातुनी वदले माता, लाभोत अशी ही बाळे
मातेची राखली लाज, अर्पुनी आपुले प्राण

त्या अमरवीरांचा देश, हा स्वतंत्र हिंदुस्थान .... ॥३॥

"अमितभोरकडे"

# ऐ मालिक तेरे बंदे हम

ऐ मालिक तेरे बंदे हम, ऐसे हो हमारे करम
नेकी पर चले और बदी से टले
ताकी हँसते हुए निकले दम ॥ ध्रु॥
ये अंधेरा घना छा रहा है, तेरा इन्सान घबरा रहा हैं
हो रहा बेखबर, कुछ न आता नजर
सुख का सुरज छिपा जा रहा है।
है तेरी रोशनी में जो दम
जो अमावस को करदे पुनम ॥ १॥
जब जुल्मों का हो सामना, तब तुही हमें थामना
वो बुराई करे, हम भलाई करे
नहीं बदली की हो कामना।
बढ उठे प्यार का हर कदम
और मिटे बैर का ये भरम ॥ २॥
बड़ा कमजोर है आदमी, अभी लाखों है इसमें कमी
पर तु जो है खड़ा है दयालु बड़ा।
तेरी कृपा से धरती थमी
दिया तुने हमें जब जनम
तू ही झेले हमारे ये गम ॥ ३॥

"अमित भोरकडे"

# उधळीत शतकिरणा ...

उधळीत शतकिरणा ... उधळीत जन हृदया
नभात आला रे... प्रभात रवि उदया
तिमिराची रजनी गेली रे गेली लया .... ॥धृ॥

थरकती चंचल जललहरी, नटली सजली वसुंधरा
मधुमय मंगल स्वरलहरी, चढल्या भिडल्या दिगंतरा
धिन धिन धिंता (२ वेळा) दुंदुभीच्या नादासंगे
अंबराच्या मंदिरात मंद वाजे सनई
जय जय बोला (२ वेळा) कोटी कोटी कंठानी
भारताच्या भविष्याच्या पहाटेच्या समयी
रेऽऽ संपली, तीऽऽ शर्वरी, येऽऽ हा रवी, याऽऽ अंबरी
उधळीत शतकिरणा ........ ॥१॥

चल करी वंदन नवयुवका, गगनी विलसे नवा रवी
तुजशी न बंधन कधी पथिका दिसली तुजला दिशा नवी
दिड़ दिड़ दारा (२ वेळा) प्राण आता झंकारती
तारुण्याच्या सामर्थ्याला कारुण्याची साथ दे
या भूमीला आकाशाचे आशीर्वाद लाभावे
पौरुषाला विक्रमाचे वैभवाचे हात दे
हीऽऽ प्रार्थना, हीऽऽ कामना, हीऽऽ भावना, हीऽऽ अर्चना
उधळीत शतकिरणा ...... ॥२॥

"अमितभोरकडे"

# जगी घुमवा रे....

जगी घुमवा रे दुमदुमवा रे भारत गौरव गान
या रक्ताला या मातीचा मृत्युंजय अभिमान
उदात्त उज्वल सुंदर मंगल आमुचा देश महान.... ॥धृ॥

काश्मिरापासून विहंगम सिंधू संगमा जावा
नेत्रावती शत चित्रांचा सुंदर साज सजावा
कधी पर्वतराई विशाला कधी अफाट हिरवी राने
कधी झुळझुळत्या गिरीबाला कधी रेतीची मैदाने
गंगेपासून तुंगेपावत अखंड हे वरदान
आमुचा देश महान ....... ॥१॥

किती शेतकरी खळ्यात मळ्यात दिसली
किती कष्टकरी डोंगरदरीत वसती
किती कामकरी घामाने भिजून हासता
कुणी दर्यावरी पाण्याची शेती कसती
अगणित जनगण बहुभाषी अन् बहुधर्मी बहुवेशी
एक मनाने प्रेमभराने नांदती भारत देशी
निजकलह विसरले सारा प्रेमाचे जुळले
झनकारीत आल्या तारा गीताला प्रिती सुंवाध
कंपीत मंथर अंतर गाणे प्रेमाचे मधुगान
आमुचा देश महान ........ ॥२॥

कशी साळी झुले - आसामच्या शेतात राया
कशी होडी डुले - केरळच्या पाण्यात राया
कशी येती फुले झेलमच्या बनात राया
कशी होडी खुले - गौरीच्या वनात राया
अधीर पदांनी रुधीर धावते एकच ताल तयाला
कोटी कोटी कठांनून आली लहरत ही स्वरमाला
गगनात दुदंभी वाजे थरथरली सुधामाई
दश दिशा प्रकाशित झाल्या , लहरीतून सागर गाई
जय जय भारत जन ललकारत उधळीत पंचप्राण
आमुचा देश महान ...... ॥३॥

"अमित भोरकडे"

# चराचराच्या सर्व शक्तींनो...

स्वर काळी १

चराचराच्या सर्व शक्तींनो  ही आमुची प्रार्थना
करा आम्हाला निर्भय निर्मळ उजळू द्या जीवना  ॥धृ॥

विद्येवर निष्ठा ठेवू द्या
उद्योगाची कास धरु द्या
साहस शिकवा संयम शिकवा
द्या जीवन चेतना ...
करा आम्हाला निर्भय निर्मळ ..... ॥१॥

नको कधी तो गर्व यशाचा
नको कधी आळस कामाचा
व्देष कुणाचा नको कधीही
द्या आम्हा प्रेरणा ...
करा आम्हाला निर्भय निर्मळ ..... ॥२॥

रक्षण करणे या सृष्टीचे
वाटो आम्हां अती मोलाचे
समतेची आणिक ममतेची
फुलवा सहभावना ....
करा आम्हाला निर्भय निर्मळ ..... ॥३॥

"अमितभोरकडे"

# उंच उंच ... गगनात... तिरंगा

उंच उंच गगनात तिरंगा डौलाने फडकतो
हृदयातून जयहिंद ... भारती सूर एक नांदतो ॥धृ॥

भारतमाता जन्मदायीनी अमृत पुत्रांची
राष्ट्रपुरुष घडविता भूमिका तुझी जिजाईची
तुझ्या किर्तीच्या अवनीवरती सुगंध दरवळतो
उंच उंच गगनात तिरंगा .... ॥ धृ॥ १

नंदनवन तू रम्य मनोहर समग्र विश्वाचे
वसुंधरा तू मूळात सुंदर प्रतिक ऐक्याचे
आम्रतरु जणू वात्सल्याची नित्य सावली देतो
उंच उंच गगनात तिरंगा .... ॥३॥ २

मनमंदिरी स्थान आईला नित्य आम्ही दिधले
उत्थानास्तव भारतभूच्या जीवन वेचू आपुले
तिची कस्तूरी गंधित माती भाळावर लावतो.
उंच उंच गगनात तिरंगा .... ॥३॥

"अमित भोरकडे"

# गीत गा रहे है आज हम

आ गये यहाँ जहाँ कदम, जिंदगी को ढूंढते हुए
गीत गा रहे हैं आज हम, रागिनी को ढुंढते हुए ॥धृ॥

अब दिलों में ये उमंग है,
ये जहाँ नया बनायेंगे
जिंदगी का दौर आज से,
दोस्तों को हम सिखायेंगे
फुल हम नया खिलायेंगे, ताजगी को ढुंढते हुए ॥१॥

दहेज का बुरा रिवाज है,
आज देश के समाज में
हुआ तबाह, आज आदमी
लुटपाट के समाज में
हम समाज भी बनायेंगे, आदमी को ढुंढते हुए ॥२॥

फिर ना डर सके कोई दुल्हन,
जोर-जुल्म का न हो निशा
मुस्कुरा उठे धरा गगन,
हम रचेंगे ऐसी दास्ताँ
हम वतन को युं सजायेंगे, रोशनी को ढुँढते हुए ॥३॥

"अमितभोरकडे"

# जय जय महाराष्ट्र माझा

जय जय महाराष्ट्र माझा
गर्जा महाराष्ट्र माझा .... ॥ धृ॥

रेवा, वरदा, कृष्णा, कोयना, भद्रा, गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमथडीच्या तट्टांना या
यमुनेचे पाणी पाजा
जय महाराष्ट्र माझा .... ॥१॥

भिती न आम्हा तुझी मुळीही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जीभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा .... ॥२॥

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा .... ॥३॥

"अमित भोरकडे"

# जननी जन्मभूमी

जननी जन्मभूमी, स्वर्ग से महान है
इसके वास्ते ये, तन है मन है और प्राण है ॥धृ॥ } २ वेळा

इसके कण-कण पे, लिखा रामकृष्ण नाम है (२ वेळा
धीर वीर रुधीर से भूमि सस्य श्याम है (२ वेळा)
धर्म का ये धाम है, सदा इसे प्रणाम है २ वेळा
स्वतंत्र है वसुंधरा, स्वतंत्र आसमान है
जननी जन्मभूमी ..... ॥१॥

इस की आन पे अगर, जो बात कोई आ पडे (२ वेळा)
इसके सामने जो जुल्म, के पहाड हो खडे (२ वेळा)
शत्रु सब जहान हो, विरुद्‌ध आसमान हो २ वेळा
मुकाबला करेंगे, हम जो जानमें, ये जान है
जननी जन्मभूमी ...... ॥२॥

इसकी गोद में हजारों, गंगा-यमुना झूमती (२ वेळा)
इस के पर्वतों की चोटियों गगन को चूमती (२ वेळा)
भूमि ये महान है, निराली इसकी शान है २ वेळा
इसकी जय-पताका पे लिखा विजय निशान है
जननी जन्मभूमी ........ ॥३॥

"अमितभोरखडे"

# हा देश माझा...

हा देश माझा, याचे भान जरासे राहू द्या रे....
जरासे राहू द्या ॥ ध्रु॥

हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
या गंगा-यमुना, शेती-धरती, बाग-बगिच्या माझा
अभिलाषा याची धरिता, कुणी नजर वाकडी करता
त्या मरण द्यावया, स्फुरण आपुले बाहू पाहू द्या रे, बाहू पाहू द्या ॥१॥

हे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहीसा अर्थ ही येवू द्या रे, अर्थही येवू द्या ॥२॥

जरी अनेक आपुले धर्म, जरी अनेक आपुल्या जाती
परि अभंग असू द्या, सदैव आपुली, माणूसकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंका रे एक तुतारी
संदेश शेष जे, द्वेश मनातील, वाहून जावू द्या रे....
वाहून जाऊ द्या ॥ ३॥

"अमित भोरकडे"

# एक दिलाची सिंहगर्जना

एक दिलाची सिंहगर्जना ... दिशा दिशातून घुमते रे ....
परचक्राची भिती नसे रे ...
चक्र सुदर्शन फिरते रे .... ॥ धृ ॥

सारेग रेगप गपध पधसां ... सांधप धपग पगरे गरेसा

सत्यासाठी पांडव लढले जगावेगळे युद्ध रंगले
महाभारती कृष्णसारथी कर्म करावे वदतो रे
चक्र सुदर्शन फिरते रे .... ॥ १ ॥

सिंहगडावर सिंह गर्जला पावनखिंडीत बाजी पडला
झाशीवाली राणी आमुची देशासाठी लढलो रे
चक्र सुदर्शन फिरते रे ... ॥ २ ॥

स्वातंत्र्यावर संकट येता .... जागृत झाली अवघी जनता
पराक्रमाची शर्थ करोती जवान आमुचे लढती रे
चक्र सुदर्शन फिरते रे .... ॥ ३ ॥

त्याग असे हा अपूर्व आपुला बलिदानातील रम्य सोहळा
भारतमाता कौतुक करते ज्योत भक्तीची जुळते रे
चक्र सुदर्शन फिरते रे ... ॥ ४ ॥

"अमित भोरखडे"

# स्वागतगीत

इतिहासाचे रंग रूप हे
आले या नगरा
स्वागतम् सुस्वागतम् हा मानाचा मुजरा ... ॥धृ॥ – २वेळा

दहा दिशांनी गुणीजण आले
सभामंडपी स्वागत झाले
पूर्वनियोजित अपूर्व घडले – २वेळा
सावरल्या नजरा ... ॥१॥

नम्र कलेचे कुणी उपासक
कुणी तपस्वी कोणी साधक
शिल्पकार हे सारे कल्पक – २वेळा
जीवन या समरा ... ॥२॥

"अमितभोरकडे"

# दिशादिशातूनी प्रसन्न

स्वर - काली - ५

दिशादिशातून, प्रसन्न होऊन, श्रावण रसरंगतो
रसिकजनांच्या स्वागतासतव निसर्ग हा बहरतो ऽऽ ॥धृ॥

अष्टदिशांचे मंडप सजतील
निळ्या नभाची कमान झुलती २ वेळा
रंगीत सुमने गंध उधळती २ वेळा
भाव नवा जागतो ....
रसिकजनांच्या स्वागतास तव निसर्ग हा बहरतो ऽऽ ॥१॥

मंत्रध्वनीची चाले कुजबुज
खगजन करी ती मंदमधूर गुंज २ वेळा
पानफुलांतून स्वरतालांचा २ वेळा
राग नवा उमलतो ....
रसिकजनांच्या स्वागतास तव निसर्ग हा बहरतो ऽऽ ॥२॥

"अमित भोरकडे"

# तुम्हां पाहता

तुम्हां पाहता वाटली धन्यता
चला पाहुण्यांचे करु स्वागता .... ॥धृ॥

जणू आज या शारदा मंदिरी
अहो भाग्य की पातले श्रीहरी
जरी सर्व संपन्नता नम्रता
चला पाहुण्यांचे करु स्वागता .... ॥१॥

करी घेऊनी सदगुणांची फुले
आम्ही ज्ञानवंता सदा पुजिले
मिळो आयुरारोग्य अभ्यागता
चला पाहुण्यांचे करु स्वागता .... ॥२॥

कुणा शब्द गंगा इथे वाहिली
कुणी ज्ञानयज्ञे मन अर्पिली
इथे अक्षरांना मिळे स्वार्थता
चला पाहुण्यांचे करु स्वागता ..... ॥३॥

"अमित भोरकडे"

# सूर झंकारले... गीत साकारले

सूर झंकारले , गीत साकारले (२ वेळा)
स्वागताला इथे, आज ते गायिले ....॥धृ॥
ला ला ला , ला ला ला , ला ला (२ वेळा)

पाहुनिया येथे, गुणीजनांना (२ वेळा)
गुंफितो आम्ही , या सुमनांना (२ वेळा)
(सांनिध निधप धपमप)
(सांनिध निधप धपगम) } २ वेळा
हर्ष दाटून ये , गीत ओठातले (२ वेळा)
स्वागताला इथे, आज ते गायिले ....॥१॥

तोषावया , मनास आपुल्या
भावफुले ही लागे फुलाया
(सांनिध निधप धपमप)
(सांनिध निधप धपगम)
हीच सुमनांजली , वाहुनिया इथे
स्वागताला इथे, आज ते गायिले .... ॥२॥
ला ला ला , ला ला ला, ला ला

"अमित भोरकडे"

# ऐक माणसा हाक तू झाडांची

ऐक माणसा हाक तू झाडांची
पर्यावरण रक्षण करण्याची ..... ॥धृ॥

जग सुंदर देखणी शाळा
झाडा वेलींचा फुलवी मळा
प्रदुषण रोखण्या पळा
मग धरणी लावीत लळा
तिच्या कुशीत माया ही ममतेची
पर्यावरणाचं रक्षण करण्याची ..... ॥१॥

सांडपाणी हे बागेत खेळवा
दारी सुंदर फुलबाग फुलवा
गोड सुगंधी सहवास मिळवा
साऱ्या सुखात घरकुल झुलवा
शांती लाभेल संसारी स्वर्गाची
पर्यावरणाचं रक्षण करण्याची ..... ॥२॥

स्वच्छ हवा नि सुंदर पाणी
पक्षी गातील मंजूर गाणी
वनश्री ही जगाची राणी
वृक्षारोपन घ्यावे ध्याती
होईल वसुंधरा देखण्या दगांची
पर्यावरणाचं रक्षण करण्याची ......॥3॥

जन्मा येवून एक करावे
एक झाडाला जीवदान
वनराईचे गुणगान गावे
हिरव्या कुशीत एकरूप व्हावे
लागेल सार्थकी नौका ही जीवनाची
पर्यावरणाचं रक्षण करण्याची ..... ॥४॥

"अमित भोरकडे"

# हिरवी छाया हिरवी माया

हिरवी छाया हिरवी माया } २ वेळा
पानोपानी हिरवी किमया
पाऊस हिरवा ऽ तुषार हिरवे २ वेळा
स्नेहा निमंत्रण (२वेळा) हिरवे हिरवे हिरवे हिरवे ॥धृ॥
लालाला लालाला लालाला लालाला

झाडे हिरवी वेली हिरव्या } २ वेळा
डोंगर हिरवे दऱ्या हिरव्या
सृष्टी हिरवी वृष्टी हिरवी २ वेळा
जिकडे तिकडे हिरवे हिरवे हिरवे हिरवे ॥१॥
ला ला ला लालाला लालाला ला ला ला

या सृष्टीच्या हिरव्या रानी } २ वेळा
चमचम करिती पाचूही हिरवे
हिरव्या रानी हिरव्या पाती २ वेळा
खेळ खेळती मन मन हिरवे मन मन हिरवे ॥२॥
मन मन हिरवे मन मन हिरवे ला ला

"अमित भोरकडे"

# स्वर्गात आकाश गंगा

स्वर्गात आकाश गंगा ... गंगेला सोनेरी घाट
घाटाला पायऱ्या शंभर ...
झाला आनंद आली बहार ॥धृ॥

घाटाशी लावीला एक एक स्वर्गीय कल्पतरू
तरूला फांद्या शंभर ...
झाला आनंद आली बहार ॥१॥

तरूच्या फांदीवर फुलं फुलती नक्षत्रांची
फुलाला पाकळ्या शंभर
झाला आनंद आली बहार ॥२॥

सुटलं वार जोरात फुले विखूरली पाण्यात
तरंग उठले शंभर ....
झाला आनंद आली बहार ॥३॥

गंगेला आला पूर अहो पूराचं पाणी चढलं
बुडाल्या पायऱ्या शंभर
झाला आनंद आली बहार ॥४॥

"अमित भोरकडे"

# आनंदाचे गाणे

चला चला गाऊ चला आनंदाचे गाणे
आनंदाचे गाणे गाऊ चला आनंदाचे गाणे ॥धृ॥

फुलपाखरांचे पंख घेऊनी उडु बागडू धुंद होऊनी
वाऱ्यासंगे नाचू चला, छेडू या तराणे ॥१॥


फुलाफुलांचे रंग घेऊया झाडे जशी उंच तसे उंच होऊया
हिरवे हिरवे रान सारे, हिरवी हिरवी पाने ॥२॥


आभाळात काहीतरी नवे पाहू या नवे नवे पाहताना नवे शोधुया
गीत नवे शब्द नवे गाऊया नव्याने ॥३॥

"अमित भोरकडे"

# राम नारायण बाजा बजाता

राम नारायण बाजा बजाता ।।ध्रु।।
ठण-ठण-ठण-ठण घंटी बजाता
पों-पों-पों पों पोंगा बजाता ।।१।।
ढम् ढम् ढम् ढम् ढोल बजाता
छुम छुम छुम छुम घुंगरू बजाता २।।
झन् झन् झन् झन् झांज बजाता
भों भों भों भों भोंगा बजाता ।।३।।
पिंव पिंव पिव पिव पुंगी बजाता
तडम् तडम् तडम् तडम् ताशा बजाता ।।४।।
ट्रिं, ट्रिं, ट्रिं, ट्रिं घंटी बजाता
स्क्रींग स्क्रींग स्क्रींग स्क्रींग सतार बजाता ।।५।।
धीन धीना धीन, धीन, धीना, धीन तबला बजाता
डुबांग डुबांग डुबांग डुबांग ढोलकी बजाता ।।६।।
सारेगम - सारेगम पेटी बजाता
राम नारायण बाजा बजाता ।।७।।



"अमित भोरकडे"

# ढगांच घरटं सोडून दूर



ढगांचं घरटं सोडून दूर
पावसाचं पाखरू आलय दूरून
अलगद त्याच्या पंखावरून... घेईन फिरून मी घेईन फिरून ॥ धृ॥
घेतलीया गिरकी वाऱ्यावर
हळूच डोलतंय तालावर
अलगद फुल मी घेईन खुडून... घेईन खुडून मी घेईन खुडून॥
आलय माझ्या मित्राचं घर
हळूच म्हणेन मी खाली उतर
देईन हात मी त्याला दूरून ... त्याला दुरून मी त्याला दूरून ॥

•••

"अमितभोरकडे"

# गंपूने

## केले साबणाचे फुगे

गंपूने केले साबणाचे फुगे
छोटे गेले पुढे मोठे राहिले मागे
एक फुगा अहा अहा एक फुगा
एक फुगा बाबांच्या चष्म्यावर बसला
गंपूला तो डोळाच वाटला ...
एक फुगा आजीच्या हातावर बसला
गंपूला तो लाडूच वाटला ....
एक फुगा ताईच्या वेणीवर बसला
गंपूला तो मोतीच वाटला ...
एक फुगा आईच्या गालावर बसला
गंपूला तो पापाच वाटला ...

"अमित भोरकडे"

Scan me

# रेल में छनननन होय रे

कृतीयुक्त गीत

रेल में छन नन छननन होय रे ॥ ध्रु॥

रेल में बैठे दो पंजाबी, रेल में बल्ले बल्ले होय रे।
रेल में बैठे दो गुजराती, रेल में एमछो केम छो होय रे।
रेल में छननन छननन होय रे ॥१॥

रेल में बैठे दो मारवाडी, रेल में म्हारो राम थारो राम होय रे।
रेल में बैठे दो बंगाली, रेल में कत्ता कत्ता भालाभाला होयरे।
रेल में छननन होय रे ॥२॥

रेल में बैठे दो तेलगु भाई, रेल में इडलीडोसा सांबरवडा होय रे।
रेल में बैठे दो कन्नड भाई, रेल में इदीर इल्ला नादीर इल्ला होयरे।
रेल में छननन छननन होय रे ॥३॥

रेल में बैठे दो मराठी भाई,
रेल में विठ्ठल विठ्ठल पांडूरंगा होय रे।
रेल में छननन छननन होय रे ॥४॥

"अमित भोरकडे"

# पळत पळत गेलो मी सासूरवाडीला

पळत पळत गेलो मी सासूरवाडीला

सासूने दिली घोंगडी बसायला
टोचतय गड्या आता टोचतय गड्या
पळत पळत गेलो .....

सासूने दिली चटणीभाकर खायला
तीखट लागतय गड्या आता तीखट लागतय गड्या

सासूने दिली सायकल बसायला
उन लागतय गड्या आता उन लागतय गड्या

सासऱ्याने दिली गाडी चालवायला
सासूने दिली बायको सोबतीला
जमलंच गड्या आता जमलंच गड्या

पण....
जड झाली गड्या आता जड झाली गड्या.

"अमित भोरकडे"

## गाण्यातून गोष्ट

एक होती म्हातारी ... जाई लेकीच्या घरी ... काठी टेकीत टेकीत
जाते ... जाते जंगलातून .... ओहोहो जाते जंगलातून ...
गुहेतनं आले वाघोबा ... लांडगोबा अन् कोल्होबा .... म्हातारीला
म्हणू लागले ... खाऊ का तुला --- गअअ खाऊ का तुला ---
म्हातारी मग घाबरली ---- थरथर कापू लागली ... हात जोडोनी
म्हणू लागली ... जाऊ द्या मला ... हेएए जाऊ द्या मला ----
लेकीच्या घरी जाऊन येते ---- तूप रोटी खाऊन येते ----
धष्टपुष्ट होऊन येते ... मग मला खा ... हेएए मग मला खा
म्हणणे तीचे ऐकले ... म्हातारीला सोडले .... काठी टेकीत
टेकीत गेली लेकीच्या घरी --- लेकीच्या घरी गेली --- तूपरोटी
खाल्ली ---- धष्टपुष्ठ झाली ---- काठी टेकीत टेकीत आली --
आली जंगलातून ---- ओहोहो आली जंगलातून ... गुहेतनं
आले वाघोबा --- लांडगोबा अन् कोल्होबा ---- म्हातारीला
म्हणू लागले ---- खाऊ का तुला ... गअअ खाऊ का तुला --
थांबा थांबा सारे जण --- ऐका ऐका सारे जण --- हात पाय
डोके माझे --- आधी खाते कोण --- हेएए आधी खाते कोण -
मी मी म्हणू लागले --- आपसांमध्ये भांडू लागले ---- कशाची
म्हातारी कशाची कोतारी ---- मला नाही ठाऊक ... चल रे
भोपळ्या टुणूक टुणूक .

**चल रे भोपळ्या टुणूक टुणूक ....**

"अमितभोरखडे"

# चिमणीचं लग्न

वऱ्हाडी कोण कोण बोला माझ्या चिमणीच्या लग्नाला

काव काव करीत कावळा आला
ताटातली करंजी घेऊन गेला
इथेच घोटाळा झाला माझ्या चिमणीच्या ....

भरारी मारत गरुड आला
कोंबडीचं पिल्लू घेऊन गेला
इथेच घोटाळा झाला....

थुई थुई नाचत मोर आला
लाडोंची करवली घेऊन गेला..
इथेच घोटाळा झाला.....

तरंगत तरंगत पोपट आला
ताटातला पेरू घेऊन गेला ---
इथेच घोटाळा झाला ....

"अमित भोरकडे"

# धोय धोय पाऊस

धितांग तांग धितांग तांग
धितांग तांग तांग

धोय धोय पाऊस पडतोयरे (धितांगतांग)
माझ्या मनीचा मोर
कसा नाचतोय रे (तकीट धा)

पाऊस रानात, पाऊस पानात
पाऊस वाऱ्यात, डोंगर दऱ्यात
टेरेस बाल्कनी भिजवून जातोय रे (धितांग तांग)
माझ्या मनीचा मोर कसा नाचतोय रे (तकीट धा)

झिम्मड पाऊस वेल्हाळ वाटतो
नदीत तुफान दुथडी वाहतो
रेनकोट नसताना पाऊस गाठतोय रे (धितांग तांग)
माझ्या मनीचा मोर कसा नाचतोय रे (तकीट धा)

मुसळधारांनी पडतो पाऊस
वाकडा तिकडा कोसळतो पाऊस
चारही दिशांनी पाऊस झोडतोय रे (धितांग तांग)
माझ्या मनीचा मोर कसा नाचतोय रे (तकीट धा)

...

"अमित भोरकडे"

# छडी नका मारु जी...

गुरुजी .... छडी नका मारु जी ....
लागतंय हातावरी .... ॥धृ॥

शाळेच्या दारात कोण ग उभी
शाळेला येते मी गुरुजी .....

अवंदाच ग वरीस बाई मी सहावं गाठलं ग
शिक्षणासाठी पहिलं पाऊल शाळेत टाकलं ग
रडू येतय वरचेवरी
आईची आठवण हैराण करी ... ॥१॥

शब्द वाचता वाचता माझी मान दुखू लागली ग
अंक लिहता लिहता माझी बोटं दुखू लागली ग
उलटे अक्षर काढले जरी
आरसा त्याला सुलटे करी .... ॥२॥

गुरुजी .... छडी नका मारु जी ....
लागतय हातावरी .... ॥

"अमितभोरखडे"

# लाटांवर लाटा

लाटांवर लाटा सागराच्या लाटा
आल्या रं ऽऽऽ आल्या रं ऽऽऽ
आरं जोसात मार कलं मार कलं रं
हैय्या हो ऽ हैय्या हो ऽ हैय्या हो ऽ हो हैय्या ॥धृ॥

चैतीच्या चांदाची कोर लाजरी } (२ वेळा)
पाण्याशी होडी कशी झुंज लाविती }
निळ्या सावळ्या ऽ दाही दिशा (२ वेळा)
झाल्या रं ऽऽऽ झाल्या रं (२ वेळा)
आरं जोसात मार कलं मार कलं रं
हैय्या हो ऽ हैय्या हो ऽऽ हैय्या हो ऽ हो हैय्या ॥१॥

होडीवर आज चला नाचू गाऊ या } २ वेळा
खंडोबाच्या रुपानं देव पाहू या }
आता मनाला भीती कशाची (२ वेळा)
नाही रं ऽऽऽ नाही रं ऽऽऽ (२ वेळा)
आरं जोसात मार कलं मार कलं रं
हैय्या हो ऽ हैय्या हो ऽऽ हैय्या हो ऽ हो हैय्या ॥२॥

"अमितभोरकडे"

# घंटा झाली टण् टण् टण्

घंटा झाली टण् टण् टण्
शाळा सुटली हूं हूं हूं
घंटा झाली शाळा सुटली
दप्तर पाठीवर घ्यायचं रस्त्याच्या कडेनं चालायचं
बाबा रस्त्याच्या कडेनं चालायचं ... ॥धृ॥
डिंग डाँग, डिंग डाँग, डिंग डाँग डिंगाक

इकडून गाडी तिकडून गाडी मध्येच रिक्षा येते
रिक्षेमागून सायकल, स्कूटर धक्का देवून जाते
या धक्क्यांनं आम्हा मुलांचं चुकून फ्रॅक्चर व्हायचं...
रस्त्याच्या कडेनं चालायचं ...... ॥१॥

रस्ता ओलांडण्यापूर्वी उजवीकडे पाहू
अर्धा रस्ता ओलांडल्यावर डावीकडे पाहू
डावं उजवं करीत करीत घरी आपल्या जायचं ...
रस्त्याच्या कडेनं चालायचं ..... ॥२॥

कुणी कुणाशी भांडायचं नाही
कुणी कुणाला ढकलायचं नाही
हसत खेळत गप्पा मारत घरी आपुल्या जायचं
रस्त्याच्या कडेनं चालायचं ...... ॥३॥

"अमित भोरकडे"

# आली आली हो भागाबाई

तीनं साडी आणा म्हटली .... आणली
तीनं चोळी आणा म्हटली .... आणली
तीनं नथ आणा म्हटली ... आणली
तीनं बुगडी आणा म्हटली .... ती बी आणली
दाजीबाच्या वाड्यात गडबड झाली ३ वेळा
अहो, माडीवरची मंडळी खाली आली ३ वेळा
असं काय झालं महाराज?.... मग ऐका ऽऽ

आली आली हो भागाबाई .....

भागाबाई बसली रडून ....
अन् लग्नाला बसली नटून
तिथं नवऱ्याचा पत्त्याच नाही ... आली आली हो भागाबाई

अहो एकदा भागाबाई निघाली जत्रला
१०० रुपयं बांधलं पदराला
तिथं मांजर आडवचं गेली ... आली आली हो भागाबाई

भागाबाई पडली डरला
ह्यो बापई नवरा ठरवला
ह्याच्या नाकाच पत्ताच नाही... आली आली हो भागाबाई
अशी आमची भागाबाई शहाणी, तिच्या जन्माची झाली कहाणी.. कडंपातुर एकलच राही

"अमित भोरखडे"

# आकार

चला चला चला आकार काढू चला
△ □ ○ ची पाहूया कला ॥ धृ ॥

तीन घेतल्या काड्या त्यांची टोके जोडून पहा
तीन कोन तीन बाजू आहेत हो त्याला
विक्स गोळी समोशाला आकार हा आला ॥१॥

आयताला चार बाजू चार काटकोन
समोरच्या बाजूमध्ये आहे सारखेपण
वही पाटी पुस्तकाला आकार हा आला ॥२॥

चौरसाला चार बाजू चारही समान
शिरोबिंदू चार नि सर्व कोन काटकोन
चौरंग नी रुमालाला आकार हा आला ॥३॥

चौरस आणि आयत यात फरक हो काय
प्रत्येकाचा कोन तर काटकोन हाय
बाजूच्या समानतेत फरक हो झाला ॥४॥
वक्ररेषेपासूनी वर्तूळ बने छान
केंद्रबिंदूपासूनी त्याचे अंतर समान
ताट तवा बांगडीमध्ये आकार हा आला ॥५॥

"अमित भोरखडे"

# ससा व कासवाची गोष्ट

(चाल - खंडेरायाच्या लग्नाला)

ससा आणि कासवाची
एकदा शर्यत लागली
शर्यत लागली ... दोघांची शर्यत लागली ... ॥ धृ॥

ससा धावत जाई दूर ...
कासवाच्या नेहमी म्होरं
हळुहळू कासवाची चाल ...
काय करेल सांगा बिचारं
पुढे ससा मागे कासव ... शर्यत लागली ... ॥ १॥

पुढे पाहून गाजर शेत ...
ससा बसला खुशाल खात -
ससा असताना झोपेत ...
कासव पुढे गेले पाहत -2
संथ गतीने जाऊन ... शर्यत जिंकली .. कासवाने शर्यत ..

गर्व झाला होता सशाला
गर्व करावा ही कशाला -2
मनी धरुया आपुल्या
कासवाच्या सातत्याला -2
दिसूनि कथा गायली ... घर गर्वाचे खाली ... शर्यत जिंकली


"अमितभोरकडे"

दख्खणच्या ग राणी मला मुंबईला जायचंय
झुकूझुकू मला मुंबईला जायचंय .... ॥ धृ॥
समुद्राच्या लाटांमध्ये मला खेळायचंय
मऊ मऊ वाळूमध्ये मला लोळायचंय .... ॥१॥
वाघ सिंह हत्ती घोडे जवळून बघायचंय
घोडागाडीमध्ये मला रपेट करायचंय ... ॥२॥
बटाट्याचा वडा मला खाऊन बघायचंय
गार गार सरबत मला नळीने प्यायचंय ... ॥३॥
लोळावळ्याच्या चिक्कीचा खाऊ खायाचाय
उंच उंच बिल्डिंग मला जवळून बघायच्यात ॥४॥

चाळणीतंल पीठ म्हणे चाळ मला नीट
चाळ म्हणे नीट म्हणे चाळ मला नीट ॥
कोपऱ्यातली काठी
कोपऱ्यातली काठी म्हणे लागेन तुझ्या पाठी
लागेन तुझ्या पाठी ऽऽ लागेन तुझ्या पाठी ... ॥
पावसाचा वारा
पावसाचा वारा म्हणे गारा वेच गारा
गारा वेच गारा म्हणे गारा ... ॥
कढईतील पुरी
कढईतीली पुरी म्हणे किती मी गोरी
किती मी गोरी म्हणे गोरी

"अमित भोरकडे"

# मुले झाली फुले



एकदा,
मुले झाली फुले, फुले झाली मुले,
मुले बसली बागेत, फुले गेली शाळेत॥
भुंगा लागला गोल मुलांभोवती फिरु,
फुले लागली शाळेत धडा पाठ करु ॥
भुंग्याला मुलांचा वासच येईना,
फुलांचा धडा पाठच होईना ॥
मुले बिचारी बागेत सुकली,
फुले बिचारी बेरजा चुकली ॥
बागेत मुलांचे तोंड झाले कडू,
शाळेत फुलांना कोसळले रडू ॥





"अमित भोरकडे"

# शिक्षण आमुचा हक्क

शिक्षण आमुचा हक्क आहे, आम्ही तो बजावणार ,
रोज शाळेत जाऊन, आम्ही खुप खुप शिकणार ...
खुप मित्र, खुप मैत्रिणी मज्जाच मज्जा येणार,
अभ्यास, खेळ नाच गाणे, यात आम्ही रमणार ...
परीक्षेचा ताण नाही, सहज शिकत राहणार
आनंदाने पुढच्या वर्गात नक्कीच आम्ही जाणार ...
वाचन लेखन गणिताबरोबर गाणी आम्ही म्हणणार
सुंदर सुंदर चित्रे काढून त्यात रंगही भरणार ...
अपंग अंध विकलांगांना मदत आम्ही करणार ,
सारे मिळून अभ्यास करून मोठे आम्ही होणार ....



"अमितभोरखडे"

# आनंदाची शाळा

लललला ... लललला ... लालालालाला ला ...
आनंदाची शाळा आमची, आनंदाची शाळा
हिरव्या हिरव्या सुरावटींचा आम्हा लागला लळा
आम्हा लागला लळा .... ॥धृ॥

खळखळ वाहे नदी, विहीरी
अन् झुळझुळणारा वारा
भाषा हिरवी, कविता हिरवी हिरवा रंगपिसारा
क्षणाक्षणाला चित्र रंगवी, आकाशाचा फळा
हिरव्या हिरव्या सुरावटींचा आम्हा लागला लळा ... ॥१॥

हिरवी झाडे, हिरवी पुस्तके
हिरवे दप्तर झाले
जणू पाचुंचा चुरा सांडूनी सारे जग हे नटले
झाडां मधूनी झुलतो सुंदर वेलींचा झोपाळा
हिरव्या हिरव्या सुरावटींचा आम्हा लागला लळा ॥२॥

परीराणीच्या गोष्टी कळती
अन् प्रयोग जादूचे
शाळा असली आम्हास वाटे जग हे मौजमजेचे
क्षण वेचाया आनंदाचे सर्व जाहले गोळा
हिरव्या हिरव्या सुरावटींचा आम्हा लागला लळा ॥३॥

आनंदाची शाळा आमची आनंदाची शाळा .

"अमितभोरकडे"

# शाळा आमची आहे किती छान

स्वर काळी- 3

लाऽ ला ला लाऽ ला ला लाऽ ला ला लाऽ

शाळा आमची
शाळा आमची आहे किती छान
नि आम्ही रोज शाळेत येणार .... ॥धृ॥
लाऽ ला ला लाऽ ....

खेळ गाणी गोष्टी इथे रंगणार
अभ्यासही इथे करणार नि आम्ही रोज शाळेत येणार ॥१॥
लाऽ ला ला लाऽ ....

नवीन नवीन गोष्टी सगळ्यांशी दोस्ती
इथं आम्ही सारं शिकणार नि आम्ही रोज शाळेत येणार ॥२॥
लाऽ ला ला लाऽ

लिहूनी वाचूनी शिकूनी सवरुनी
अफलातून होऊनी जाणार
नि आम्ही रोज शाळेत येणार ॥३॥
लाऽ ला ला लाऽ

"अमित भोरकडे"

पळत पळत गेलो मी...

# 'माझ्या शाळेला'...

पळत पळत गेलो मी Z.P. शाळेला...
गुरुजीने दिले फूल स्वागताला
आनंद वाटतोय गड्या आता
आनंद वाटतोय गड्या... ॥१॥

पळत पळत गेलो मी...
गुरुजींनी दिला गणवेश घालायला
मस्त दिसतो गड्या आता,
मस्त दिसतो गड्या...॥२॥

पळत पळत गेलो मी...
गुरुजींनी नेले खेळ खेळायला
मज्जा वाटते गड्या आता
मज्जा वाटते गड्या... ॥३॥

पळत पळत गेलो मी...
गुरुजींनी दिले वरणभात खायला
पोट भरलं गड्या आता
पोट भरलं गड्या...॥४॥

पळत पळत गेलो मी...
गुरुजींनी दिले पाटीपेन्सिल लिहायला
लिहायला शिकलो गड्या आता
लिहायला शिकलो... ॥५॥

पळत पळत गेलो मी...
गुरुजींनी दिले पुस्तक वाचायला
वाचन शिकेल गड्या आता
वाचन शिकेल ... ॥६॥

पळत पळत गेलो मी...
गुरुजींनी केले संस्कार मनाला
माणूस बनलो गड्या आता
माणूस बनलो गड्या...॥७॥

"अमित भोरकडे"

# आली आली पारू शाळेला

आली, आली, आली पारू शाळेला
शिक्षणाचा शुभारंभ झाला, अज्ञानावर प्रहार पहिला ।
आली. आली. आली पारू शाळेला ... ॥ धृ ॥

बाई, गुरुजींच्या मुखी मायेचा झरा,
लाजरी, बुजरी पारू लागली बोलू तरतरा ।
ओढ शाळेची लागली मनाला, केले दंडवत, विद्या साधनेला
आली. आली. आली पारू शाळेला ... ॥१॥

खेळ, गाणी, गोष्टींमुळे सरली भीती,
क्षमतांच्या सागरात डुंबली किती ।
निसर्ग सारा तिचा मित्र झाला, केले आपलेसे वाऱ्या पावसाला
आली, आली. आली पारू शाळेला ... ॥२॥

मूल्य शिक्षणाचे बिज मनी रुजले,
बाल फुल शाळेमध्ये फुलू लागले ।
हक्क आपुला तिला हा मिळाला, नाही डरणार ती अन्यायाला
आली, आली, आली पारू शाळेला ... ॥३॥

झुगारील पारू आचाराच्या कुबड्या, विकासाच्या प्रवाहात घेऊनी उड्या ।
तोंड देईल. भयाण वादळाला, नाव नेईल सुखाने तटाला.. आली आली... ॥४॥

"अमित भोरकडे"

# ताराची शाळा

चल शाळेला चल चल तारा
नको राहू तू घरच्या घरा

पिऊ वारा पाणी, नाचु गाऊ गाणी,
टोला पुढं नेऊ या सारी ॥ धृ॥

या जंगलची किताब वाचु
वारा गाणी गातो तू मी नाचु
अक्षरानं लिहू, गणितानं मोजू
चल शोधूया ज्ञानाचा झरा ॥१॥

नको डरु कोणाला तू राणी, या देशाची आहेस तू धनी
लिहा वाचायचा, सारं शिकायचा, रस्ता लोकशाहीचा खरा ॥२॥

चल झटपट शाळेला पोरी, उठ हाती घे देशाची दोरी
हक्क शिकायचा, नीट जगायचा, आणु मानानं आपुल्या घरा ॥३॥

शाळा बदलली बघ-बघ बाई, आता गुरुजी नाचे गाई
नाव दाखल करु, रोज नियम धरु, खेळ खेळत शिकवायचा ॥४॥

"अमित भोरखडे"

# आई माझी

आई माझी मायेचा सागर
दिला तीने जीवना आकार ॥ धृ॥

आईवडील माझे थोर
काय सांगु त्यांचे उपकार
जीवनाच्या वाटेवरती
किती असतो त्यांचा आधार
आई माझी .... ॥ १॥

तळपत्या उन्हात अन् रखरखत्या रानात
राहीलीस तु माझ्यासाठी कष्टाच्या घामात
कधी मिळेल मुठभर घास, कधी घडे तिला उपवास
ओल्या मातीतुन चालतांना तुडवील काट्यांचे फास
आई माझी .... ॥ २॥

नभीची चांदणी तू चंद्राची कोर
शितल तुझी छाया मला हवी जीवनभर
तुझ्या शितल छायेमध्ये
उभं आयुष्य जगेन
आई देवापाशी मी गं तुला जन्मोजन्मी मागेन
आई माझी .... ॥ ३॥

"अमित भोरखडे"

# आई तुझे उपकार फिटणार नाही....

॥ आई तुझ्या मूर्तीवाणी
या जगात मूर्ती नाही
अनमोल जन्म दिला गं आई
तुझे उपकार फिटणार नाही...॥

बालपणी मी खेळत खेळत
होतो जेव्हा तान्हा
अमृताहुनी गोड पाजला होता पान्हा
तुझ्या या उपकाराची कधी जाणीव झाली नाही...॥

शाळेतून घरी येताना
आई उशीर मजला होई
गल्लोगल्ली पाहत फिरे अन् हाका मारी
तुझ्या या प्रेमाची कधी जाणीव झाली नाही... ॥

अनमोल जन्म दिला गं आई
तुझे उपकार फिटणार नाही ।।

"अमित भोरकडे"

# पसायदान

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज द्यावे । पसायदान हें ।।
(आता सर्व विश्वाचा आत्मा जो परमेश्वर त्याने या वाङ्‌मय
यज्ञाने संतुष्ट होऊन मला इतके पसायदान द्यावे.)

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।
(की दुष्टांची वाकडी नजर सरळ होवो, आणि त्यांच्या
अंतःकरणात सत्कृत्यांबद्दल प्रेम वाढीस लागो आणि सर्व
भूमात्रांमध्ये परस्पर जीवाची मैत्री उत्पन्न होवो.)

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सुर्ये पाहो ।
जो जे वांछील तो तें लाहो । प्राणीजात ।।
(पापाचा अंधार नष्ट होवो, आणि आत्मज्ञानाच्या प्रकाशाने
सर्व विश्व उजळो, मग जो जो प्राणी जे जे इच्छिल, ते ते
त्याला लाभो.)

वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।
(आणि सर्व मांगल्याचा वर्षाव करणारे जे संतसज्जनांचे
समुदाय, त्यांची भेट या भूतलावर सर्व भूतमात्राला अखंड होवो

चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।
(हे संतसज्जन म्हणजे चालत्या कल्पवृक्षांचे अंकुर होत,
किंवा हे चैतन्यरुपी चिंतामणीरत्नाचे गाव अथवा
अमृताचे बोलते सागर समजोत.)

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।
(कलंकहीन असा जो चंद्र किंवा तापहीन असा जो सूर्य,
तसे हे साधुसज्जन सर्वांचे सततचे सोयरे आहेत.)

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनी तिन्हीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुषी । अखंडीत ।
(सारांश, तिन्ही भुवने अद्वैतसुखाने परिपूर्ण भरुन
आदिपुरषाच्या भजनाला अखंडपणे लागोत.)

आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।
(आणि विशेषतः या लोकी ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन
आहे, त्यांना ऐहिक व पारलौकिक सुख्यांचा लाभ घडो)

तेथ म्हणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।
(हे ऐकताच विश्वेश्वर प्रभू म्हणाले, हा प्रसाद तुला
दिला आहे, या वरदानाने ज्ञानदेव फार सुखी झाला.)

(ज्ञानेश्वरी - पसायदान)